| | |
|---|---|
| | **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**<br>**नागरिकांची सनद** |
| **१** | **प्रस्तावना -**<br><br>मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य - संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते.<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट 'पुस्तक प्रकाशन' हे आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाड्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात . खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर , वैचारिक , उच्च दर्जाचे बौद्धिक , वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाही असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात .<br>**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना / उपक्रम -**<br>(१) पुस्तक प्रकाशन योजना<br>(२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना<br>(३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना<br>(४) नवलेखकांची चर्चासत्रे / कार्यशाळांना अनुदान योजना<br>(५) साहित्य संस्थांना अनुदान<br>(६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान<br>(७) नियतकालिकांना अनुदान<br>(८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना<br>(९) विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार<br>(१०) श्री. पु. भागवत पुरस्कार<br>(११) जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना<br>(१२) बृहद्ग्रंथ योजना |

**कार्यालयाची संरचना (तक्ता स्वरुपात)**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ संरचना**

सचिव गट - अ

↓

अधीक्षक - १ पद

↓

प्रपाठक - १ पद

↓

सहायक लेखा अधिकारी - १ पद

↓

उच्चश्रेणी लघुलेखक - १ पद

↓

निम्नश्रेणी लघुलेखक - १ पद

↓

वरिष्ठ लिपिक - ४ पदे

↓

ग्रंथालयीन सहायक - १ पद

↓

लिपिक - टंकलेखक - ७ पदे

↓

वाहन चालक - १ पद

↓

शिपाई - २ पदे

| | |
|---|---|
| **२.** | **परिशिष्ट-१ (अधिका-यांची यादी व संपर्क दूरध्वनी)** |

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई** | ०२२ - २४३२५९३० | ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in |
| **सचिव ,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई** | ०२२ - २४३२५९२९ | ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in |
| **कार्यालय,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई** | ०२२ - २४३२५९३१ | ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in |

| | |
|---|---|
| **३.** | **परिशिष्ट-२<br>(कार्यपूर्तीचे वेळापत्रक)** |

| कार्यासन क्रमांक | विषय | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते. | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी (दालन क्रमांक व दूरध्वनी क्रमांक) | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **मंडळाची आस्थापना शाखा** | मंडळाच्या आस्थापनाविषयक बाबींची पूर्तता करणे आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी पाहणे, मंडळाच्या कार्यालयात सर्वसाधारण देखरेख ठेवणे, शिस्त राखणे, कनिष्ठ कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे,शासनाशी व इतर | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती | अधीक्षक हे पद सद्य:स्थितीत रिक्त आहे. या पदाचे काम श्री. प्र.ना.मोरे पाहतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९२९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यालयाशी पत्रव्यवहार करणे, विधानसभा/विधान परिषद प्रश्नांच्या संदर्भात व भारत सरकारशी मा. सचिवांच्या सुचनेनुसार कार्यवाही करणे, सचिवांच्या गैरहजेरीत इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी व जनतेशी कार्यालयीन व्यवहार, तसेच दूरध्वनी करणे वगैरे, सचिवांच्या सुचनेनुसार वार्षिक अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, पंचवार्षिक योजना यांसंबधीचे आराखडा तयार करणे, गोपनीय अभिलेख सांभाळणे, कर्मचाऱ्यांची रजा, अग्रीमे बघणे, लेखा परिक्षण व लेखाविषयक कामे, लोकलेखा समितीशी संवाद इत्यादी. कार्यालयाने वेळोवेळी सोपविलेली इतर कामे नियमित पार पाडणे. | शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागांचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल. | प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक.<br>(०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी -<br>secretary.sblc-mh@gov.in | |
| | **मंडळाची पुस्तक प्रकाशन शाखा व ललित/ ललितेत्तर पुस्तकांना अनुदान शाखा** | मंडळाच्या व समित्यांच्या बैठकींची सर्व कामे, बैठकींची विषयसूची व वृत्तांत तयार करणे, मंडळाच्या व समितींच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर विशेषत: वाङ्मयीन निर्णयावर कार्यवाही करणे, मंडळाकडे आलेल्या टंकलिखित साहित्याचे लेखक, | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती | या पदाचे काम<br>श्री. रा.मु. रोकडे, प्रपाठक पाहतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५ | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९२९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकाशक व मुद्रणालय यांच्याशी कार्यक्रमानुसार व मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पत्रव्यवहार करणे, मंडळाने प्रकाशनार्थ/अनुदानार्थ स्वीकारलेल्या टंकलिखित साहित्याची पूर्ण माहिती सुरक्षित ठेवणे व त्यावर मंडळाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणे , टंकलिखित साहित्य मुद्रणालयास सोपविण्यापूर्वी त्याची प्रत्यक्ष तपासणी करून ती व्यवस्थित व परिपूर्ण आहेत का याची खात्री करणे, पुस्तक मुद्रणार्थ प्रकाशकाकडे सोपविणे, पुस्तके प्रकाशित होईपर्यंत प्रकाशकांशी/ मुद्रणालयांशी आणि लेखकांशी पत्रव्यवहार करणे, विविध मुद्रणालयांकडे / प्रकाशकांकडे सोपविलेल्या पुस्तकांच्या कामाच्या सततच्या प्रगतीवर व ती पुस्तके लवकर प्रकाशित होण्यावर लक्ष ठेवणे, मुद्रित झालेली पुस्तके प्रकाशित करून ती मंडळाच्या सदस्यांना वितरित करणे,तसेच मंडळाच्या वतीने स्वीकारलेल्या पुस्तकासंबंधी विविध लेखक, संपादकांकडून करारपत्र करून घेणे त्याचप्रमाणे | शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागांचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल. | दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१ ई मेल आयडी - secretary.sblc-mh@gov.in | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रकाशकांकडे प्रकाशनासाठी सोपविलेल्या पुस्तकासंबधी प्रकाशकांशी पत्रव्यवहार करणे, प्रदर्शने, जाहिराती याद्वारे मंडळाच्या प्रकाशनांची व मंडळाच्या वाङ्मयीन कार्याची प्रसिध्दी करणे, स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना व मंडळाच्यावतीने हाती घेण्यात येणारे विविध वाङ्मयीन बृहदप्रकल्पासंदर्भातील कामकाज पार पाडणे व कार्यालयाने वेळोवेळी सोपविलेली इतर कामे पार पाडणे. | | | |
| | **नवलेखक अनुदान शाखा/ नवलेखक कार्यशाळा शाखा/ नियतकालिक अनुदान शाखा** | नवलेखक अनुदान योजनेची दरवर्षी जाहिरात प्रसिद्धीस देणे, जाहिरातीनुसार आलेली टंकलिखित साहित्याची वाङ्मय प्रकारानुसार नोंद घेणे, रजिस्टर ठेवणे, नवलेखक अनुदान समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवणे, बैठकीसंबंधी विषयसूची, वृत्तांत तयार करणे, बैठकीत झालेल्या निर्णयानुसार निवड झालेली टंकलिखित साहित्य तज्ज्ञांकडे अभिप्रायार्थ सोपविणे | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबधित | या पदाचे काम श्री. सं.पो. देशट्टीवार, वरिष्ठ लिपिक पाहतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी - secretary.sblc- | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९२९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तदनंतर टंकलिखित साहित्य प्रकाशनार्थ प्रकाशकांकडे सोपविणे,लेखकाशी, तज्ज्ञांशी प्रकाशकांशी पत्रव्यवहार करणे, नवलेखकांना मार्गदर्शन व्हावे म्हणून वाङ्मयप्रकारानुसार कार्यशाळांचे आयोजन करणे,<br>मंडळातर्फे अनुदान मिळत असलेल्या नियतकालिकांना नियमित अनुदान वाटप करणे, नियतकालिक संस्थांशी पत्रव्यवहार करणे, नियतकालिक बैठकीत नियतकालिकांची विषयसूची ठेवणे, त्यावर झालेले निर्णय संबधीतांना कळविणे, वृत्तांत लिहिणे वगैरे तसेच कार्यालयाने सोपविलेली इतर कामे. | नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागांचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल. | mh@gov.in | | |
| | **मंडळाची लेखाशाखा** | मंडळाच्या कार्यालयातील मासिक वेतन देयके, अध्यक्षांचे मानधन व आतिथ्य भत्ता, मंडळाचे अध्यक्ष व सदस्यांचे प्रवास व बैठक भत्ता देयके, आकस्मिक खर्चाची देयके, स्थायी अग्रीम नोंदवही, रोखीचे पुस्तक (Cash Book) आकस्मिक व इतर खर्चाची वर्गीकृत नोंदवही तसेच उत्सव अग्रीम, आगाऊ प्रवास भत्ता, | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात | श्रीमती श्वेता राणे, सहायक लेखा अधिकारी, व स्वाती सु. केसरकर, वरिष्ठ लिपिक ह्या देयके तयार करतात.<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१ | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९२९ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन व भत्ते इत्यादी तसेच वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी, अग्रीम नोंदवही इत्यादी तपासणी. वार्षिक अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, वार्षिक विकास कार्यक्रम आदीसंबंधीची माहिती तयार करणे, लेखा आक्षेपांना उत्तर देणे, खर्च मेळ, विनियोजन लेख्यासंबधी माहिती घेणे, महालेखापाल कार्यालयाकडून होणाऱ्या वार्षिक लेखापरिक्षण पथकास माहिती व कागदपत्रे पुरविणे, रोखीचे व्यवहार पाहणे, एन.ई.एफ. टी करणे /धनादेश पाठविणे तसेच कॅशबुक, स्थायी अग्रीम नोंदवही, आकस्मिक खर्च नोंदवही, वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची नोंदवही, देयक नोंदवही अद्यायावत ठेवणे, लेखाशाखेतील कागदपत्र सुरक्षित ठेवणे, तसेच किरकोळ पत्रव्यवहार करणे. कार्यालयीन सर्व प्रकारची देयके (आकस्मिक, प्रवासभत्ता व इतर) तयार करून अधिदान व लेखा कार्यालयास सादर करणे, पदाच्या अनुषंगाने येणारी व | येईल. अन्य विभागाशी संबधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागांचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल. | ई मेल आयडी - secretary.sblc-mh@gov.in | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यालयाने सोपविलेली इतर कामे. | | | |
| | **ग्रंथालय शाखा** | मंडळाच्या कार्यालयातील ग्रंथाची देखभाल करणे व ग्रंथाची नोंदवहीत नोंद ठेवणे, कार्यालयातील शोकेसमध्ये नव्याने प्रकाशित होणारी मंडळाची व मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित झालेली सर्व पुस्तके लावणे, जनतेच्या मागणीनुसार मंडळाच्या प्रकाशनाची सूची पाठविणे. मंडळाच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकीस व उपसमितीच्या बैठकीस उपस्थित सदस्यांना प्रकाशित पुस्तकांचे वाटप करणे व देवघेव नोंदवहीत नोंद ठेवणे. ग्रंथालयाशी संबंधित वेळोवेळी नेमून दिलेली इतर कामे | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागांचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल. | श्री. प्र. ना. मोरे, ग्रंथालयीन सहायक,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१<br><br>ई मेल आयडी - secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२) २४३२५९२९ |

४. **परिशिष्ट-३**

**(अधिनियम व नियमांची यादी)**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची निर्मिती शा.नि.सा.प्र.वि.क्र.बीएलसी - १९६० - के, दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० या शासन निर्णयान्वये झालेली आहे. मराठी भाषा विभागाकडून वेगवेगळया विषयाबाबत प्राप्त होणारे शासन निर्णय, परिपत्रक, अध्यादेश, यानुसार तसेच वेळोवेळी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या बैठकीत घेण्यात येणाऱ्या वाङ्मयीन निर्णयानुसार विविध वाङ्मयीन धोरणात्मक निर्णयांची अमंलबजावणी केली जाते. मंडळाशी संबधित विविध

शासन निर्णय शासनाच्या, मंडळाच्या तसेच मराठी भाषा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | ललित/ललितेत्तर वाङ्मयासाठी अनुदान | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं २०१३/प्र.क्र.१८०/२०१३ भाषा - ३, दि. १ ऑक्टोबर, २०१४ |
| २) | नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक - सासंमं १०१३/प्र.क्र.१६५/२०१३/भाषा - ३,दिनांक ७ डिसेंबर, २०१३ |
| ३) | नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक नलेका - २०१९/प्र.क्र. ५७/भाषा - ३, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ व मराठी भाषा विभाग शासन शुध्दीपत्र क्रमांक : नलेका - २०१९/प्र.क्र. ५७/भाषा - ३, दिनांक ०९ऑगस्ट, २०१९ |
| ४) | सात साहित्य संस्थांना अनुदान - | मराठी भाषा विभाग शासन निर्णय सापअ - १०१५/प्र.क्र. १४७/२०१५/भाषा - ३, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ |
| ५) | अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अनुदान - | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक अभासं - २०२३/प्र.क्र.३/भाषा - ३, दि. २२ डिसेंबर, २०२३ |
| ६) | वाङ्.मयीन नियतकालिकांना अनुदान योजना- | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक सासंमं - १०१३/प्र.क्र. १६६/२०१३/भाषा - ३,दिनांक १५ जानेवारी, २०१४ |
| ७) | जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना - | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रासांधो - २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. ०६ जून, २०२५ व मराठी भाषा विभागाचे पत्र क्र. रासांधो २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. १६ जून,२०२५ |
| ८) | पुस्तक प्रकाशन योजना | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक : सासंमं १०१४/प्र.क्र.३००/२०१४/भाषा, दिनांक १५/१२/२०१४ |
| ९) | स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रावापु - १०१२/ प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दि.१० सप्टेंबर, २०१२, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक पुरस - १०१२/प्र.क्र.१११/२०१२/भाषा - ३, दि. ०३ मार्च, २०१४ व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रावापु - १०१४/प्र.क्र.१२०/२०१४/भाषा - ३, दि. ०२ फेब्रुवारी, २०१६ |
| १०) | विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. विंदापु - १०१४/प्र.क्र.११२/२०१४/भाषा - ३, दि. १२ फेब्रुवारी, २०१५ व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. विंदापु - १०१४/प्र.क्र.११२/२०१४/भाषा - ३ दि. १२ जुलै, २०१८, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १६ ऑक्टोबर, २०२० , मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १० नोव्हेंबर, २०२० व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२३/प्र.क्र.११/भाषा - ३ दि. २७ सप्टेंबर, २०२४ |
| ११) | श्री. पु. भागवत पुरस्कार | मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक श्रीपुभा- १०१४ /प्र.क्र.११३/२०१४/भाषा - ३, दि. १२ फेब्रुवारी, २०१५ , मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १६ ऑक्टोबर, २०२०, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १० नोव्हेंबर, २०२० व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२३/प्र.क्र.११/भाषा - ३ दि. २७ सप्टेंबर, २०२४ |

| | |
|---|---|
| ५. | **परिशिष्ट-४ कार्यालयांतगर्त महत्त्वाच्या समित्या/ मंडळे व पुरस्कारांची यादी तसेच विविध योजना/प्रकल्पांची /उपक्रमांची माहिती -** |

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक : सासंमं - २०२४/प्र.क्र. १०१/भाषा - ३, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुनर्रचना करून मंडळावर मा. अध्यक्ष/सदस्य यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची व समित्यांची रचना खालीलप्रमाणे आहे.

| समितीचे नांव | अध्यक्ष | अशासकीय सदस्य |
|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | डॉ. सदानंद मोरे | २३ अशासकीय सदस्य |
| वाङ्मय प्रकल्प समिती | डॉ. सदानंद मोरे | ०४ अशासकीय सदस्य |
| नियतकालिक अनुदान समिती | डॉ. सदानंद मोरे | ०५ अशासकीय सदस्य |
| नवलेखक अनुदान समिती | डॉ. सदानंद मोरे | ०४ अशासकीय सदस्य |

६. **परिशिष्ट- ५**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रम/ प्रकल्पांची माहिती -**

**१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना -**

सदर योजनेमध्ये साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर , वैचारिक , उच्च दर्जाचे बौद्धिक , वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाही असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते.

**मंडळातर्फे पुस्तक प्रकाशन अनुदान योजना कार्यपद्धती -**

१) संबंधित लेखकाकडून मंडळाकडे प्राप्त झालेल्या संहिता वाड्.मय प्रकल्प समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ व निर्णयार्थ ठेवल्या जातात.
बैठकीतील निर्णयानुसार संहिता त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठवल्या जातात.

२) तज्ज्ञांनी अनुकूल अभिप्राय दिल्यास सदर पुस्तक मंडळाकडून प्रकाशित केले जाते. तज्ज्ञांचा अभिप्राय प्रतिकूल असेल तर मंडळाकडून पुस्तक प्रकाशित केले जात नाही.

३) या योजनेअंतर्गत मंडळाकडून प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाच्या लेखकाला १००० शब्दासाठी ९००/- रू. व अनुवादकाला १००० शब्दासाठी १०००/- रू. इतके लेखन मानधन दिले जाते.

५) संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी - एक वर्ष

**२) <u>ललित/ललितेत्तर वाङ्मयासाठी अनुदान</u>** - या योजनेअंतर्गत मराठीतील ललित/ललितेतर विषयांवरील वाङ्मयीन गुणवत्तापूर्ण अशा लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**<u>मंडळातर्फे ललित/ललितेत्तर वाङ्मयासाठी अनुदान योजना कार्यपद्धती</u> --**

१) या योजनेअंतर्गत मंडळाकडे अर्ज करणाऱ्या संस्था अथवा व्यक्तिला रु..३०,०००/- च्या मर्यादेत अनुदान दिले जाते.

२) संबंधित व्यक्तींकडून/संस्थेकडून मंडळाकडे प्राप्त झालेल्या संहिता वाड्.मय प्रकल्प समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवल्या जातात

३) सदस्यांनी निवड केलेल्या संहिता त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठवल्या जातात.

४) अनुकूल अभिप्राय आल्यास संबंधित लेखकाला पुस्तकाच्या छपाईसाठी रु.३०,०००/- च्या मर्यादेत अनुदान दिले जाते.

५) संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी - एक वर्ष

**३) <u>नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान योजना -</u>** या योजनेत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही अशा लेखकांना काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललितगद्य व बालवाङ्मय या लेखनाच्या प्रथम प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते.

**<u>नवलेखक अनुदान योजनेचा लाभ देण्याची कार्यपद्धती</u>**

१) नवलेखक अनुदान योजनेची प्रसिद्धी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात दिली जाते व दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत टंकलिखित साहित्य स्विकारली जाते .

२) मंडळाच्या **<u>https://sahitya.marathi.gov.in</u>** या संकेतस्थळावरही ही माहिती ठेवली जाते.

३) या प्रसिद्धीच्या अनुषंगाने निर्धारित कालावधित आलेले सर्व टंकलिखित साहित्य नवलेखक अनुदान समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येते.

४) वाड्.मय प्रकारानुसार संबंधित तज्ज्ञांकडून टंकलिखित साहित्याचा दर्जा व गुणवत्ता तपासली जाते.

५) त्यानंतर अनुकूल अभिप्राय असलेल्या टंकलिखित साहित्य प्रकाशनार्थ प्रकाशकांना सोपविले जाते.

६) प्रतिकूल अभिप्राय असलेल्या लेखकांना नकार कळविला जातो.

७) या योजनेत मुद्रणासाठी पुस्तके मिळावीत म्हणून प्रकाशकांनी मंडळाकडे अर्ज करावा लागतो. नवलेखक अनुदान समिती प्रकाशकांचा दर्जा, अनुभव, विश्वासार्हता बघून दरवर्षी प्रकाशकांची यादी तयार करते व जुन्या यादीवरही पुर्नविचार केला जातो.

८) नवलेखकांच्या ज्या टंकलिखित साहित्याला अनुकूल अभिप्राय मिळतो ते टंकलिखित साहित्य मुद्रणासाठी निवड झालेल्या प्रकाशकांकडे पाठविले जाते.

९) प्रकाशकाला मुद्रण पूर्ण झाल्यावर निर्मिती खर्चाच्या ७५ टक्के रक्कम दिली जाते.

१०) संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी -- एक वर्ष

४) **<u>नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा</u>** - नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे,म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांच्या कार्यशाळा/चर्चासत्रे आयोजित केल्या जातात.

**५) <u>सात साहित्य संस्थांना अनुदान</u>** - मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी अनुदान योजनेंतर्गत

१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

२) विदर्भ मराठी साहित्य परिषद, नागपूर

३) मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर

४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई

६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी

७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. १०.०० लाखाचे अनुदान देण्यात येते.

**६) <u>नियतकालिकांना अनुदान योजना</u>**-- या योजनेत बहुविध वाङ्मयीन, समाजोपयोगी, समीक्षात्मक, वैचारिक इत्यादी नियतकालिकांचा अंतर्भाव असतो. अशा नियतकालिकांचा वाङ्.मयीन दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार केला जातो.

**<u>नियतकालिकांना अनुदान कार्यपद्धती</u> --**

१) मंडळाकडे अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या नियतकालिकांचा या योजनेमधून अनुदान देण्यासाठी विचार केला जातो.

२) नियतकालिक अनुदान समितीपुढे मंडळाला प्राप्त झालेले सर्व अर्ज व नियतकालिके विचारार्थ ठेवली जातात.

३) समितीचे सदस्य वाङ्.मयीन नियतकालिकांची गुणवत्ता, दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार करुन अनुदानासाठी शिफारस करणे किंवा अनुदानासाठी अपात्र ठरवणे, अनुदान वाढ किंवा घट करणे , अनुदान थांबविणे अशा पद्धतीने निर्णय घेतात.

४) सदस्यांनी नियतकालिकांसंदर्भात घेतलेला प्रतिकूल / अनुकूल अभिप्राय संबंधितांना कळविला जातो.

५) अनुदानासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अनुदान मान्य होईपर्यंतचा कालावधी--अंदाजे एक वर्ष

**७) जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना** - या योजनेत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०२४ नुसार महाराष्ट्रातील ३६ जिल्हयातील, जिल्हा साहित्य संमेलनास दरवर्षी प्रत्येकी रक्कम रू. ५.०० लक्ष याप्रमाणे अनुदान दिले जाते.

**जिल्हा साहित्य संमेलनास अनुदान योजनेची कार्यपद्धती -**

१) या योजनेअंतर्गत मंडळाकडून दरवर्षी एप्रिल अखेर वृत्तपत्रात जाहिरात देवून दिनांक १ मे ते ३१ मे या दरम्यान राज्यातील संस्था नोदंणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी असलेल्या संस्थांकडून अर्ज मागविले जातात.

२) मंडळाच्या https;//sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावरही वरील कालावधीत सदर योजनेची माहिती व अर्ज उपलब्ध करून देण्यात येतो.

३) संमेलनाच्या अनुदानासाठी संस्थांकडून विहित कालमर्यादेत (दि. १ मे ३१ मे या दरम्यान) मंडळास प्राप्त झालेले अर्ज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या बैठकीत अंतीम निवडीसाठी ठेवण्यात येतात व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रासांधो - २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. ०६ जून, २०२५ या

शासन निर्णयात व मराठी भाषा विभागाचे पत्र क्र. रासांधो २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. १६ जून,२०२५ रोजीच्या शासन पत्रात नमूद नियमावलीतील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या संस्थाची निवड मंडळाच्या बैठकीत सदस्य एकमताने करतात व मंडळाच्या बैठकीत निवड करण्यात आलेल्या संस्थांना जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यासाठी मंडळाकडून अनुदान वितरीत केले जाते.

**७.** **परिशिष्ट- ६**

**<u>१) स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना</u> -** मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रावापु - १०१२/ प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दि.१० सप्टेंबर, २०१२, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक पुरस - १०१२/प्र.क्र.१११/२०१२/भाषा - ३,दि. ०३ मार्च, २०१४ व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रावापु - १०१४/प्र.क्र.१२०/२०१४/भाषा - ३, दि. ०२ फेब्रुवारी, २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना राबविली जात असून या योजनेअंतर्गत अ)प्रौढ विभागात २२ साहित्य पुरस्कारासाठी प्रत्येकी १ लक्ष रकमचे एकुण २२ पुरस्कार दिले जातात. ब)बालवाङ्मय पुरस्कार या विभागात ६ साहित्यप्रकारासाठी प्रत्येकी ५० हजार रकमेचे ६ पुरस्कार दिले जातात. क)प्रथम प्रकाशन विभागात ६ साहित्य प्रकारासाठी प्रत्येकी ५० हजार रकमेचे ६ पुरस्कार ड) सरफोजी भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार या विभागात रू. १ लक्ष रकमेचा एक पुरस्कार असे रू. २९ लक्ष रकमेचे एकूण पस्तीस पुरस्कार प्रदान केले जातात.

**<u>स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेची कार्यपद्धती --</u>**

१) या योजनेअंतर्गत दरवर्षी दि. १ जानेवारी, ते ३१ डिसेंबर, या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांना (प्रथम आवृत्ती) निवडी अंती पुरस्कार देण्यासाठी मंडळाकडून डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात वृत्तपत्रातून प्रसिद्धी देवून दिनांक ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत प्रवेशिका मागविल्या जातात.

२) मंडळाच्या https;//sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावरही वरील कालावधीत स्पर्धेसाठी माहिती व प्रवेशिका उपलब्ध करून देण्यात येते.

३) वरील कालावधीत मंडळाकडे प्राप्त झालेल्या प्रवेशिका व पुस्तकांची छाननी केली जाते व तद्नंतर शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या परीक्षण समितीतील संबधित परीक्षकांकडे त्या त्या वाङ्मय प्रकारातील पुस्तके परीक्षणार्थ व निवडीसाठी पाठविली जातात.

४) परीक्षकांकडून निवडलेल्या पुस्तकांना दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन कार्यमक्रमात शासनाकडून पुरस्कार प्रदान केले जातात. पुरस्काराची वाङ्मय प्रकार निहाय यादी खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **वाङ्मय प्रकार** | **पुरस्काराचे नाव** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | प्रौढ वाङ्मय - काव्य | कवी केशवसुत पुरस्कार | १,००,०००/- |
| २ | प्रौढ वाङ्मय - नाटक/एकांकिका | राम गणेश गडकरी पुरस्कार | १,००,०००/- |
| ३ | प्रौढ वाङ्मय - कादंबरी | हरी नारायण आपटे पुरस्कार | १,००,०००/- |
| ४ | प्रौढ वाङ्मय - लघुकथा | दिवाकर कृष्ण पुरस्कार | १,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रौढ वाङ्मय - ललितगद्य (ललित विज्ञानासह) | अनंत काणेकर पुरस्कार | १,००,०००/- |
| ६ | प्रौढ वाङ्मय - विनोद | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार | १,००,०००/- |
| ७ | प्रौढ वाङ्मय - चरित्र | न.चिं. केळकर पुरस्कार | १,००,०००/- |
| ८ | प्रौढ वाङ्मय - आत्मचरित्र | लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार | १,००,०००/- |
| ९ | प्रौढ वाङ्मय - समीक्षा/ वाङ्मयीन संशोधन/सौंदर्यशास्त्र/ ललितकला आस्वादपर लेखन | श्री.के. क्षीरसागर पुरस्कार | १,००,०००/- |
| १० | प्रौढ वाङ्मय - राज्यशास्त्र/ समाजशास्त्र | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | १,००,०००/- |
| ११ | प्रौढ वाङ्मय - इतिहास | शाहू महाराज पुरस्कार | १,००,०००/- |
| १२ | प्रौढ वाङ्मय - भाषाशास्त्र / व्याकरण | नरहर कुरूंदकर पुरस्कार | १,००,०००/- |
| १३ | प्रौढ वाङ्मय - विज्ञान तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह) | महात्मा जोतीराव फुले पुरस्कार | १,००,०००/- |
| १४ | प्रौढ वाङ्मय - शेती व शेतीविषयक पूरक व्यवसायलेखन | वसंतराव नाईक पुरस्कार | १,००,०००/- |
| १५ | प्रौढ वाङ्मय - उपेक्षितांचे साहित्य (वंचित, शोषित, पिडीत, आदिवासी, कष्टकरी, अनुसूचित जाती व नव बौद्ध इत्यादी) | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार | १,००,०००/- |
| १६ | प्रौढ वाङ्मय - अर्थशास्त्र व अर्थशास्त्रविषयक लेखन | सी.डी. देशमुख पुरस्कार | १,००,०००/- |
| १७ | प्रौढ वाङ्मय - तत्त्वज्ञान व मानसशास्त्र | ना.गो. नांदापूरकर पुरस्कार | १,००,०००/- |
| १८ | प्रौढ वाङ्मय - शिक्षणशास्त्र | कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार | १,००,०००/- |
| १९ | प्रौढ वाङ्मय - पर्यावरण | डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार | १,००,०००/- |
| २० | प्रौढ वाङ्मय - संपादित/आधारित | रा.ना.चव्हाण पुरस्कार | १,००,०००/- |
| २१ | प्रौढ वाङ्मय - अनुवादित | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार | १,००,०००/- |
| २२ | प्रौढ वाङ्मय - संकीर्ण (क्रीडासह) | भाई माधवराव बागल पुरस्कार | १,००,०००/- |
| २३ | प्रथम प्रकाशन - काव्य | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | ५०,०००/- |
| २४ | प्रथम प्रकाशन - नाटक/ एकांकिका | विजय तेंडूलकर पुरस्कार | ५०,०००/- |
| २५ | प्रथम प्रकाशन - कादंबरी | श्री.ना. पेंडसे पुरस्कार | ५०,०००/- |
| २६ | प्रथम प्रकाशन - लघुकथा | ग.ल. ठोकळ पुरस्कार | ५०,०००/- |
| २७ | प्रथम प्रकाशन - ललितगद्य | ताराबाई शिंदे पुरस्कार | ५०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | प्रथम प्रकाशन - समीक्षा सौदर्यशास्त्र | रा.भा. पाटणकर पुरस्कार | ५०,०००/- |
| २९ | बाल वाङ्मय - कविता | बालकवी पुरस्कार | ५०,०००/- |
| ३० | बाल वाङ्मय - नाटक व एकांकिका | भा.रा. भागवत पुरस्कार | ५०,०००/- |
| ३१ | बाल वाङ्मय - कादंबरी | साने गुरुजी पुरस्कार | ५०,०००/- |
| ३२ | बाल वाङ्मय - कथा (छोट्या गोष्टी, परिकथा, लोककथासह) | राजा मंगळवेढेकर पुरस्कार | ५०,०००/- |
| ३३ | बाल वाङ्मय - सर्वसामान्यज्ञान (छंद व शास्त्रे) | यदुनाथ थत्ते पुरस्कार | ५०,०००/- |
| ३४ | बाल वाङ्मय - संकीर्ण | ना.धों. ताम्हणकर पुरस्कार | ५०,०००/- |
| ३५ | सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | १,००,०००/- |

**२) <u>विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार</u>** - राज्य शासनाच्यावतीने साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्यावतीने सन २०१२ - १३ या वर्षापासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप रू. १०,००,०००/- (अक्षरी रूपये दहा लक्ष फक्त ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**<u>विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्काराची कार्यपद्धती</u> --**

१) दरवर्षी या पुरस्कारासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व तिच्या ४ घटकसंस्था तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर तसेच मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त तीन कार्यालयाकडून मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांच्या नावांच्या शिफारशी मागविण्यात येतात.

२) सदर शिफारशी शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या निवड समितीसमोर ठेवल्या जातात.

३) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. विंदापु - १०१४/प्र.क्र.११२/२०१४/भाषा - ३ दि. १२ फेब्रुवारी, २०१५ व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. विंदापु - १०१४/प्र.क्र.११२/२०१४/भाषा - ३ दि. १२ जुलै, २०१८ , मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १६ ऑक्टोबर, २०२० , मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १० नोव्हेंबर, २०२० व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक पुरस - २०२३/प्र.क्र.११/भाषा - ३, दि.२७ सप्टेंबर, २०२४ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार प्राप्त शिफारशीतून निवड समितीकडून एका ज्येष्ठ साहित्यिकाची निवड पुरस्कारासाठी निवड केली जाते.

४) निवड समितीकडून विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड झालेल्या ज्येष्ठ साहित्यिकास दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रमात सदर पुरस्कार शासनाकडून प्रदान केला जातो. विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या मान्यवरांची यादी

| अ.क्र. | वर्ष | सन्मानित साहित्यिकांचे नाव |
|---|---|---|
| १ | २०१० | श्रीमती विजया राजाध्यक्ष |
| २ | २०११ | श्री. के.ज. पुरोहित |
| ३ | २०१२ | श्री. ना.धों. महानोर |
| ४ | २०१३ | श्री. वसंत आबाजी डहाके |
| ५ | २०१४ | प्रा. द.मा. मिरासदार |
| ६ | २०१५ | प्रा. रा.ग. जाधव |
| ७ | २०१६ | श्री. मारुती भुजंगराव चितमपल्ली |
| ८ | २०१७ | श्री. मधु मंगेश कर्णिक |
| ९ | २०१८ | श्री. महेश एलकुंचवार |
| १० | २०१९ | श्रीमती अनुराधा पाटील |
| ११ | २०२० | प्रा. रंगनाथ पठारे |
| १२ | २०२१ | श्री. भारत सासणे |
| १३ | २०२२ | प्रा. चंद्रकुमार नलगे |
| १४ | २०२३ | डॉ. रवींद्र शोभणे |
| १५ | २०२४ | श्री. रावसाहेब रंगराव बोराडे |

**३) श्री.पु.भागवत पुरस्कार** - मंडळाच्यावतीने सन २०१२ - १३ या वर्षापासून श्री.पु.भागवत पुरस्कार देण्यात येत आहे. साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु.भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रू. ५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**श्री. पु. भागवत पुरस्काराची कार्यपद्धती** --

१) दरवर्षी या पुरस्कारासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व तिच्या ४ घटक संस्था तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर तसेच मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त तीन कार्यालयाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थांच्या नावाच्या शिफारशी मागविण्यात येतात.

२) सदर शिफारशी शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या निवड समितीसमोर ठेवल्या जातात.

३) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक श्रीपुभा- १०१४ /प्र.क्र.११३/२०१४/भाषा - ३ दि. १२ फेब्रुवारी, २०१५, मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३ दि. १६ ऑक्टोबर, २०२० व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. पुरस - २०२०/प्र.क्र.६६/भाषा - ३, दि. १० नोव्हेंबर, २०२० अन्वये निश्चित

करण्यात आलेल्या निकषांनुसार प्राप्त शिफारशीतून एका प्रकाशन संस्थेची निवड केली जाते.

४) निवड समितीकडून श्री.पु. भागवत पुरस्कारासाठी निवड झालेल्या प्रकाशन संस्थेस दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात सदर पुरस्कार शासनाकडून प्रदान करण्यात येतो. श्री. पु. भागवत पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या प्रकाशन संस्थाची यादी

| अ.क्र. | वर्ष | सन्मानित संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | २००८ | पॉप्यूलर प्रकाशन |
| २ | २००९ | साकेत प्रकाशन |
| ३ | २०१० | मौज प्रकाशन |
| ४ | २०११ | नवचैतन्य प्रकाशन |
| ५ | २०१२ | मॅजेस्टिक प्रकाशन |
| ६ | २०१३ | राजहंस प्रकाशन |
| ७ | २०१४ | केशव भिकाजी ढवळे प्रकाशन |
| ८ | २०१५ | कॉन्टिनेन्टल प्रकाशन |
| ९ | २०१६ | भारतीय विचार साधना |
| १० | २०१७ | वरदा प्रकाशन |
| ११ | २०१८ | साहित्य प्रसार केंद्र |
| १२ | २०१९ | पद्मगंधा प्रकाशन |
| १३ | २०२० | शब्दालय प्रकाशन |
| १४ | २०२१ | लोकवाङ्मय गृह |
| १५ | २०२२ | ग्रंथाली |
| १६ | २०२३ | राजहंस प्रकाशन |
| १७ | २०२४ | ज्योत्स्ना प्रकाशन |

| ८. | **परिशिष्ट-७**<br>**(केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियुक्त केलेले जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची यादी)** | | | |
|---|---|---|---|---|

| ई. क्र. | विषय | राज्य सहायक जन माहिती अधिकारी | राज्य जन माहिती अधिकारी | अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १) | आस्थापना शाखा - मंडळाच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक बाबी हाताळणे, सेवापुस्तकाच्या सर्व नोंदी जतन करणे, लेखन सामग्री विषयक नोंदी, पदभरती पदाचे प्रस्ताव व अन्य आस्थापनाविषयक प्रकरण करणे. | -- | अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई<br>दुरध्वनी क्रमांक : २४३२५९३१ (०२२)<br>ई-मेल : secretary.sblc- mh@gov.in | सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई<br>दुरध्वनी क्रमांक : २४३२५९२९ (०२२)<br>ई-मेल : secretary.sblc- mh@gov.in |
| २) | प्रकाशन शाखा - प्रकाशनविषयक बाबी, स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार योजना, श्री. पु.भागवत पुरस्कार योजना, जिल्हा साहित्य | प्रपाठक, राज्य सहायक जन माहिती अधिकारी | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संमेलन अनुदान योजना, सांस्कृतिक धोरणातील मंडळाकडे सोपविलेले प्रकल्प/ योजना व मंडळाने हाती घेतलेले प्रकल्प/ योजना<br><br>लेखा शाखा - मंडळाच्या कार्यालयाची सर्व देयके तपासणे, खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इतर अन्य लेखाविषयक कामे | सहायक लेखा अधिकारी, राज्य सहायक जन माहिती अधिकारी | | | |
| | | ३) | | | | | |